Vol 5 Issue 1 July 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.in**

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 1 | July - 2015

# विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या आणि सामाजिकता

रामलीला सुदामराव पवार

**सारांश :**

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यानी मराठी कादंबऱ्याची समध्दता वाढवण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या 'पांगिरा', 'झाडाझडती','पानिपत','संभाजी' या कादंबऱ्यातील सामाजिकतेचा आढावा या अनुषंगाने कादंबऱ्यातील समाजजीवन, स्त्रीजीवन, धार्मिक, आर्थिक, राजकीय स्थिती, न्यायव्यवस्था, रुढी-प्रथा,परंपरा,श्रध्दा-अंधश्रध्दा, पोषाख, दागदागिने व्यवसाय इत्यार्दीचे तपशीलवार वर्णन या कादंबऱ्यामधून आढळते.विश्वास पाटील यांनी दर्जेदार कादंबऱ्या लिहील्या आहेत. कुठल्याही एका कादंबरी प्रकारात न आडकता वास्तव जीवन दर्शन घडवताना उपेक्षित, वादग्रस्त, समस्याप्रधान विषयाला गवसणी घालणाऱ्या कांदबऱ्या विश्वास पाटील यांनी लिहील्या आहेत.

**Short Profile**

Ramlila Sudamarav Pawar
Department of major art colleges , Tirthapuri.

## प्रस्तावना :

विश्वास पाटील हे मराठी साहित्यातील महत्त्वाचे कादंबरीकार आहेत. 'पांगिरा', 'पानिपत','झाडाझडती','महानायक','संभाजी' या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. विश्वास पाटील हे प्रयोगशील कादंबरी लेखन करणारे लेखक आहेत. ऐतिहासिक आणि सामाजिक कादंबऱ्यांची निर्मिती पाटील यांनी केली आहे. एकाच कादंबरी प्रकारात न आडकता उपेक्षित, वादग्रस्त, समस्याप्रधान,वास्तव यासारखे विषय त्यांनी आपल्या कादंबऱ्यामधून हताळले आहेत. 'क्रांतीसूर्य',महानायक' या चरित्रात्मक कादंबऱ्या लिहून भारतीय इतिहास जीवंत केला आहे. 'झाडाझडती' या कादंबरीतून इतिहासाला जीवंत केले आहे. 'झाडाझडती' या कादंबरीत धरणग्रस्तांचे प्रश्न मांडून त्यांच्या दुःखाला वाचा फोडण्याचे काम केले आहे.'पांगिरा'मधून ग्रामीण बदलाचे चित्रण केले आहे. वास्तवदर्शी कादंबरीकार म्हणून पाटील हे यशाच्या शिखरावर पोहचलेले आहेत.

## विश्वास पाटील यांचे साहीत्य :-

विश्वास पाटील यांनी कथा कादंबऱ्या, नाटक, अनुवादित साहित्य, नेतांजीवरील भाषणाचे पुस्तक या शिवाय वृत्तपत्र आणि नियतकालिकामधूनही लेखन केले आहे. विश्वास पाटील यांचे साहित्य पुढील प्रमाणे आहे.
'कलालचौक'-कथासंग्रह(१९८६),'आंबी'-कादंबरी(१९८६),'क्रांतिसूर्य'-कादंबरी(१९८४),'पानिपत'-कादंबरी(१९८८),'पांगिरा'-कादंबरी(१९९०),'झाडाझडती'-कादंबरी(१९९२),'महानायक'-कादंबरी(१९९८),'चंद्रमुखी'-कादंबरी(२००४),'संभाजी'-कादंबरी .(२००५), 'रणांगन' नाटक (१९९९), 'चलो दिल्ली'-अनुवादित संग्रह(१९८६)
विश्वास पाटील यांनी सुरुवातीच्या काळात कथा लिहिल्या, परंतु नंतर ते कादंबरी लेखनाकडे वळले आणि एकाहून एक उत्कृष्ट कादंबऱ्या लिहून त्यांनी कादंबरी विश्वाला समृद्ध करण्याचे काम केले आहे.

## 'पांगिरा'तील सामाजिकता :-

'पांगिरा' या ग्रमीण कादंबरीत सामाजितेचे चित्रण केलेले आढळते. ग्रामीण समाजाचे जीवन शहरी समाजजीवनापेक्षा वेगळे असते शेती,शेतीची अवजारे,जनावरे,निसर्ग, दैववाद, धार्मिकता, श्रद्धा-अंधश्रद्धा, राहणीमान या सर्वच बाबतीत वेगळेपणा जाणवतो. ग्रामीण माणसाचे आपल्या जनावरावर, आपल्या माणसांवर जिवापाड प्रेम

मराठी विभाग प्रमुख कला महाविद्यालय,तीर्थपुरी.

असते. ग्रामीण जीवन हे अंत्यंत कबाडकष्टाचे, अनेक प्रश्न आणि समस्यांनी ग्रामीण जीवन त्रस्त असते. कधी नैसर्गिक संकटे तर कधी मानवनिर्मित संकटे असली तरी ग्रामीण माणसं गुण्यागोंविदाने जीवन जगतांना दिसतात. 'पांगिरा' या कादंबरीत अशीच ग्रामिणता प्रत्ययाला येते.

'पांगिरा' ही एका खेडे गावची कहाणी आहे. काळ बदलला तसे गावाचे रुपही बदलेले आहे. 'पांगिरा' हे पाण्याच्या बाबतीत सधन गाव असते, पण गावकऱ्यांना पाण्याचे महत्त्व नसल्याने गावातील तरूण गावकऱ्याना पाण्याचे महत्त्वसांगतो. काही वर्षानंतर जेव्हा पाण्याचा समस्या निर्माण होतात तेव्हा, लोक पाण्यासाठी काहीही करायला तयार होतात. ग्रामीण जीवन, ग्रामीण समाज तेथील येऊ घातलेल्या सुधारणा राजकारणामुळे बदललेली मानवी वृत्ती, ग्रामीण जीवनाचे अंतबाहय परिवर्तन, ग्रामीण माणसाच्या समस्या यांचा वेध पाटील यांनी या कादंबरीत घेतला आहे. विश्वास पाटील यांनी बदलणाऱ्या सामाजिक वास्तवाची जाणिव असल्यामुळे ग्रामीण समाजाच्या वेदनेविषयीचे चित्रण कादंबरीत केले आहे. ''स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाची परंपरा नसलेला बहुजन समाज शिक्षणामुळे जागा झाला यातुनच नवे कवी, लेखक जन्माला आले ते त्यांच्या समाजाविषयी त्यांना त्यांच्या समाजाला भोगाव्या लागणाऱ्या व्यथा-वेदने विषयी लिहू लागले तेव्हा त्यांचे हे लिहिणे पारंपरिक मराठी साहित्यापेक्षा वेगळे असणे स्वाभाविक होते त्यांच्या वेगळेपणाची मुळे समाजजीवनात होती. ''पांगिरा' कादंबरीत विश्वास पाटील यांनी गावाच्या परिसरातील रुढी परंपरांचा उल्लेख केला आहे.. गाव,गावची जत्रा, जत्रेतील प्रथा, बोरींग घेताना शेताची पूजा, कोबंडा उतरवून टाकण्याची प्रथा यासारखा अंधश्रद्धांचा वेध घेतला आहे.

गावातील राजकारण, त्यांचे डावपेच सरपंच, पोलीस पाटील, तलाटी इ. कामे सभापती ग्रामपंचायत निवडणुका भाषण, प्रचार इत्यादींचे वर्णनही 'पांगिरा'तून येते. राजकारणातील दलबदलुपणा, स्वार्थीवृत्ती,भ्रष्टाचार वाढते वैमनस्य, व्यसनाधीनता पैशाचा वाढता वापर यासारखा गोष्टी 'पांगिरा'त पहायला मिळतात. स्वातंत्र्यानंतरचा काळ असल्याने शैक्षणिक उदासिनता ग्रामीण भागात पहायला मिळते. अशिक्षिततेमुळे परावलंबीत्व वाढतांना दिसते त्यामुळे आर्थिक परिस्थिती बेताचीच आहे. 'पांगिरा'तील समाजजीवनात स्त्रियांना दुय्यम दर्जा आहे. अशा प्रकारे 'पांगिरा'तील समाजजीवनात चांगले-वाईट, कष्टकरी, गरीब, श्रीमंत, सधनतेकडून, संपन्नतेकडून दुष्काळाच्या खाईत जाणाऱ्या कष्टकरी वर्गाचे चित्रण येते.

### *'झाडाझडती' मधील सामाजिकता:-*

विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' ही कादंबरी सामाजिक कादंबरीत मैलाचा दगड ठरलेली कादंबरी आहे. या कादंबरीत धरणग्रस्तांच्या समस्यांचे चित्रण आले आहे. कष्टकरी, शेतकरी यांच्याविषयीची कणव याही कादंबरीत जाणवते. यातील घटना-प्रसंग, व्यक्तिचित्रणे, राजकीय व्यक्तिंचे वर्चस्व, धनदांडग्यांची हुकुमशाही सर्वसामान्यांना जीवनावश्यक गोष्टीसाठी करावा लागणारा संघर्ष, प्रतिकूल परिस्थितीतही जगण्याची धडपड करणारी माणसे ही काल्पनीक नसून वास्तवीक आहेत. विश्वास पाटील यांनी 'झाडाझडती'मधून धरणग्रस्तांच्या दुःखाला वाचा फोडली आहे. त्यांच्या समस्यां, त्यांची होणारी फसवणूक त्यांना मिळणारी तुच्छतेची वागणूक याचे सखोल चित्रण केले आहे.

'झाडाझडती' ही सामाजिक कादंबरी आहे याविषयी सदा कऱ्हाडे म्हणतात, ''१९६० नंतर बहुजननिष्ठ सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या तरी रुढ नमुनारुपातील तंत्रामंत्राचीच अनुकृती होत राहिली, पण विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती'ने सामाजिक कादंबरीचे नवे नमुनारुप सिद्ध केले ही अंत्यत स्पृहणीय स्वागतार्ह घटना आहे.''१ 'झाडाझडती' तील समाज त्यांच्या गुणदोषांसकट वाचकाच्या डोळ्यापुढे उभे करण्याचे काम विश्वास पाटील यांनी केले आहे.

'झाडाझडती' कादंबरीत घटना-प्रसंगाच्या अनुषंगाने येणारे सामाजजीवन चित्रित झाले आहे. ''विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' ही एक लक्षणीय सामाजिक कादंबरी आहे. सामान्य वाचक सुजाण वाचक आणि चोखंदळ वाचक अशा सर्वांचेच लक्ष हया कादंबरीने वेधून घेतले आहे.''२झाडाझडती या कादंबरीत राजकारण त्यातील व्यक्ति, सत्ता, सत्तेची नशा सत्तेचा वाटेल तसा वापर करणारे यांचे वास्तव चित्रण आले आहे. धरणग्रस्तांच्या जमीनी दडपशाहीने मिळवल्या जातात धरणग्रस्तांना मोबदला देताना त्यात भ्रष्टाचार केला जातो. भूसंपादन अधिकारी गोरगारिबांना फसवतात. कंत्राटदार सरपंच कारकून तलाठी अशी सरकारी कर्मचारी भरपूर पैसे कमावतात, भ्रष्टाचाऱ्याच्या मागे

राजकारणी असल्यामुळे त्यांची ताकद अधिकच वाढते.

'झाडाझडती' तील समाज ग्रामीण अशिक्षित आहे. ग्रामीण स्त्रीचे चित्रणही यातुन पहायला भेटते. यातील स्त्रीया पुरुषाच्या बरोबरीने काम करणाऱ्या आहेत. कठीण प्रसंगाला त्या न डगमगता सामोरे जातांना आढळतात. यातील काही स्त्रीया अशिक्षित असल्या तरी स्वाभिमानी आहेत. अन्यायाविरोधात संघर्ष करायला तत्पर असणाऱ्या स्त्रिया या कादंबरीत भेटतात. आवडा,बनुबाई, नकुसा, फुला, हिरा, शेवंती, कमळी, साळू, मंजुळा, या स्त्रीव्यक्तिरेखा ठसठसीतपणे चित्रित झाल्या आहेत.

### 'पानिपत' कादंबरीतील सामाजिकता:—

विश्वास पाटील यांची 'पानिपत' ही कादंबरी ऐतिहासिक कादंबरी आहे. या कादंबरीतला काळ पेशवेकाळ आहे पेशवेकाळातील समाजजीवनाचे तत्कालीन समाजातील रुठी-परंपरांचे चित्रण या कादंबरीत चित्रित झाले आहे. पेशवकाळातील पोशाख राहणीमान भाषा सण-समारंभ, व्यवसाय, जातियता, धर्मिक, आर्थिक, राजकीय स्थीतीचे तसेच स्त्रिजीवनाचे चित्रण या कादंबरीत आविष्कृत झाले आहे. 'पानिपत' कादंबरीतील प्रथा-परंपरा पेशवेकाळातील आहेत. उदा. गोड बातमी कळल्यावर भिक्षुकांना दक्षिणा देणे, गळ्यातला एखादा दागिना देणे, स्त्रीयांचे बाळंतपण माहेरी करणे, स्त्रीयांनी सती जाणे तहात ठरल्या प्रमाणे दोन्हीकडील पक्ष वागत असत, जिकंलेल्या सैन्याचे स्वागत थाटामांटाने केले जाई. जिंकलेल्या सैन्यांना हारतुरे दिले जात असे, पत्नीचे निधन झाल्यावर किंवा जिवंत असतांनाही पुरुषांना दुसरा विवाह करता येत होते. लढण्यासाठी मुहूर्त काढले जाई. उदा. पानिपत मोहिमेवर जांताना शिवालिखिताचा मुहूर्त काढण्यात येतो. अशा प्रकारे वेगवेगळ्या रुढी-प्रथांवरुन तत्कालीन समाजजीवन प्रत्ययाला येते. ''पानिपत' महाकाव्याच्या तोलामोलाची कादंबरी तिशीच्या आतील एका तरुणाच्या हातून सिद्ध झालेली मराठीतील ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या अग्रभागी मानाने मिरवावी अशी किंबहुना खऱ्या अर्थाने पहिलीच मराठी ऐतिहासिक कादंबरी म्हणावी अशी बावनकशी कृती''३ 'पानिपत' या कादंबरीत पेशवेकालीन भाषेचा वापर केला गेला आहे. भाषेमुळे पानिपत ही कादंबरी वाचकाला पानिपतच्या युद्धसंग्रमात घेऊन जाते समाजात आपापल्या स्तरानुसार षषा बोलली जात असे षिक दृष्ट्या पानिपत कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

### 'संभाजी' कादंबरीतील सामाजिकता:—

विश्वास पाटीलयांची 'संभाजी' ही कादंबरी देखिल ऐतिहासिक आहे या कादंबरीमध्ये संभाजी राजेचा संपूर्ण जीवनपट चित्रित झाला आहे. ही चरित्रात्मक कादंबरी असून त्यामध्ये संभाजीचे गुण, प्राक्रम, शौर्य निर्भयता, धीरोदात्तपणा, कणखरपणा, न्यायी, वृत्ती, मनाचा मोठेपणा,संवेदनशीलता, प्रेमळता, भावुकता अशा सर्व गुणानी कादंबरी ओतपोत भरली आहे. ''इतिहासाची इमान राखून कागदपत्रातील पुरावे लक्षात घेऊन विश्वास पाटील यांनी शंभूराजांची ही संघर्षगाथा सिद्ध करतांना एक कादंबरीकार म्हणुनही आपले सामर्थ्य प्रकट केले आहे.''४ कल्पनेचा आधार न घेता वास्तव लेखन केले आहे.

'संभाजी' ही ऐतिहासीक कादंबरी असल्याने या कादंबरीतील स्त्रिजीवन तत्कालीन ऐश्वर्याने नटलेले आहे. यातील बहुतांश स्त्रीया राजघराण्यातील ऐश्वर्यसंपन्न आहेत. जिजाबाई, सोयराबाई, येसुबाई, गोदाबाई, राणुबाई, दुर्गाबाई या सर्व स्त्रीया शाही असल्याने या धाडसी देखील आहेत. संभाजी कादंबरीतील समाजजीवनातील स्त्रीजीवन विविधतेने अविष्कत झाले आहे. गोदु शिवाजी महाराजांवरचे संकट टाळण्यासाठी रायगडावर जाते. सोयराबाई सत्तेसाठी कट-कारस्थाने करते. पुतळाबाई सोज्वळ होत्या. तर हंसा ऐकतर्फी प्रेमात आत्मघात करुन घेते. 'संभाजी' कादंबरीतही तत्कालीन रुढी-प्रथा-परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा, धार्मिक स्थिती, राज्यकारभार, राज्यव्यवस्था मुसलमानी राज्यकारभार हेरखाते आर्थिक स्थिती कुटुंबसंस्था सण, समारंभ, उत्सव, पोषाख व दागदागिने या सर्वानी संभाजी कादंबरीतील समाजजीवन समद्ध आहे.'संभाजी' ही कादंबरी सोळाव्या शतकातील आहे. त्यामुळे त्या काळातील भाषेचा प्रभाव या कादंबरीवर उमटलेला आहे.या भाषेमुळे संभाजी कादंबरीतील समाजजीवन डोळ्यापुढे उभे राहते. सोळाव्या शतकातील जातियता देखील या कादंबरीत आढळते. तत्कालीन न्यायाधिशाचे काम काझी करीत असत.संपत्ती जप्त करणे,जीभ कापणे,डोळे फाडणे, हत्तीच्या पायी देणे या सारख्या शिक्षा सुनावून ते आपली दहशत निर्माण करत असत.त्याकाळात बहुपत्नीत्वाची पध्दत होती. सती जाने दानधर्म करणे, मुहुर्त पाहणे, नवस बोलणे,स्त्रियांनी घुंगट घेणे या प्रथा समाजात होत्या. तत्कालीन समाज आपपाल्या परिस्थितीनुसार

दागदागिणे वापरतअसत आणि आपआपल्या स्तरानुसार भाषा वापरत असत.

## विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचे वेगळेपण :–

विश्वास पाटील यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत.आपल्या कादंबऱ्याव्दारे त्यांनी समकालीन वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'पांगिरा' वेगळ्या प्रकृतीची कहाणी आहे. यामधुन पाटील यांनी ग्रामीण जीवन अविष्कृत केले आहे. एका सधन खेड्याचे चित्रण यातून येते. काळ बदलला तशी काळाच्या ओघात माणसेही बदलतात. स्वार्थासाठी आपल्याच माणसांना त्रास देतात, अप्पलपोटी वागतात.'पांगिरा' गावाचाझपाट्याने होणारा बदल लेखकाने तपशिलाने चित्रित केला आहे. जनसामान्यांच जिणं हेच कादंबरीत प्रामुख्याने चित्रित झाले आहे. याकादंबरीला नायक नाही झपाट्याने होणारे परिवर्तन हाच कादंबरीचा विषय आहे.

'पानिपत' ही महाकाव्याचा तोलामोलाची कादंबरी आहे. या कादंबरीत पानिपतच्या युद्धाची कहाणी आहे पानिपतचा रणसंग्राम व त्यानुषंगाने येणारे घटना-प्रसंग इत्यादी या कादंबरीत आले आहे पानिपतच्या युद्धात मराठयांचा निःपात झाला. त्याचे सविस्तर वर्णन कादंबरीत आले आहे. मराठी सरदारांमधील फुटीरता असहकार्य, उपासमार, निसर्गाचा प्रकोप, स्त्रीयांवरील अत्याचार, मराठयांचा झालेला दारुण पराभव या सर्वाचे वास्तव चित्रण करुण पानिपतचा संबंध पट डोळ्यासमोर जिवंत केला आहे.

'झाडाझडती' ही एक लक्षणीय सामाजिक कादंबरी आहे ही कादंबरी वास्तवदर्शी आहे यामध्ये धरणग्रस्तांच्या समस्या अडचणी त्यांचे पुनर्वसनाचे प्रश्न यांचा आढावा घेतला आहे पुनर्वसन कायदयाचा अपुरेपणा, धनदांडग्याची धीटाई यामुळे जांभळी गावातील लोकांच्या वाढलेल्या समस्या नेमकेपणाने मांडलेल्या आहेत

'संभाजी' ही चरित्रात्मक ऐतिहासिक स्वरुपाची कादंबरी आहे. या कादंबरीव्दारेसंभाजीचे तेजस्वी संघर्षमयजीवनपट वाचकाच्या डोळ्यापुढे उभा केला आहे. या कादंबरीव्दारे विश्वास पाटील यांनी खरे ऐतिहासिक सत्य जगापुढे मांडले आहे उदार, उमद्या व्यक्तिमत्त्वाचे संभाजी राजे स्वराज्याच्या कल्याणासाठी झटणारे, विरोधकांना क्षमा करणारे कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडणारे संभाजी राजे धाडसी,पराक्रमी होते. मृत्युलाही न घाबरता हसत-हसत सामोरे जाणारे संभाजीचे चरित्र रेखाटुन वाचकाच्या मना मनात त्यांच्याविषयी आदर निर्माण करण्यात विश्वास पाटील यशस्वी झाले आहेत.

## समारोप

विश्वास पाटील यांनी आपले कादंबरी लेखन स्वानुभवातून केले आहे. त्यांचे अनुभवविश्व व्यापक आणि समृद्ध आहे. वास्तव अनुभवातून विश्वास पाटील यांनी समाजजीवनाचे चित्रण केले आहे. त्यांना जे जाणवल,ज्यामुळे ते अस्वस्थ झाले ते वास्तवानुभव कादंबऱ्यांमधून चित्रित केले आहे. 'पांगिरा' ही ग्रामीण कादंबरी लिहितांना विश्वास पाटील यांनी टिपिकल साच्यात न अडकता वास्तव जीवनदर्शन घडवले आहे. ग्रामीण समाजजीवन, त्यात होणारे बदल,शेतीची,कष्टाची कामे ग्रामीण भागातले राजकारण,राजकारणाचा प्रसार अशा सर्व वर्णनामुळे कादंबरी अस्सल वाटते.

विश्वास पाटील यांच्या सर्वच कादंबऱ्यातून मानवी मनाची स्पंदने,मानवी मनाच्या विविध अवस्था, मनाचा हळवेपणा, दुःख,वेदना,कणखरपणा आणि मानवाच्या स्वभावातील चढउतार विश्वास पाटील यांनी प्रभावीपणे मांडले आहेत. मानवी स्वभावाचे अनेकविध कांगोरे, विविध वृत्ती-प्रवृत्ती, अगतिकता यामुळे कादंबऱ्या जीवंत वाटतात. त्यामुळे वाचक दुःखी हळवे होतात त्यांच्या 'पांगिरा', 'झाडाझडती', 'पानिपत', 'संभाजी' या कादंबऱ्याचा शेवट शोकात्म होता. विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या पाल्हाळिक नसून नेमकेपणाने त्या चित्रित झाल्या आहेत. विश्वास पाटील यांच्या सर्वच कादंबऱ्यांमधून समाजातली क्रुरता व्यक्त झाली आहे. त्यांच्या कादंबऱ्यामधुन व्यापक, वास्तव जीवनानुभव मांडल्यामुळे विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या वेगळ्या, दर्जेदार ठरल्या आहेत.

## निष्कर्ष :–

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यातील सामाजिकता अभ्यासत असतांना खलील निष्कर्ष हाती लागली आहे.

१.विश्वास पाटील यांनी कादंबऱ्यामध्ये ग्रामीण समाज जीवनाचे दर्शन विस्तृतपणे आणि वास्तवपूर्ण घडवले आहे.

२.विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यामध्ये ग्रामीण समाज डोळ्यापुढे हुबेहुबपणे उभा राहतो. बदलत्या सामाजिक जीवनाचा

वेध कादंबऱ्यामधून घेतला आहे.

३.'पांगिरा' कादंबरीतील समाजात अशिक्षिता होती एकत्र कुटुंबपद्धती होती राजकारणाचे स्वरुप माणसांची वृत्ती, निसर्गाचे स्वरुप, बदलते समाजजीवन वास्तवपणे मांडले आहे.

४.'झाडाझडती' ही धरणग्रस्तांच्या जीवनावरील कादंबरी आहे. एका समाजजीवनाची वाताहत दाखवणारी ही कादंबरी आहे.

राजकारण समाजकारण भ्रष्टाचार यांचे वास्तव दर्शन घडवणारी ही कादंबरी आहे.

५.'पानिपत' ही कादंबरी पानिपतच्या युद्धावर आधारित आहे. तत्कालीन समाजजीवन या कादंबरीत पहायला मिळते. पेशवेकालीन समाजजीवनाचे दर्शन या कादंबरीतून घडते.

६.'संभाजी' या ऐतिहासिक कादंबरीमध्ये शिवाजीरांजाच्या काळातील समाजजीवन चित्रित झाले आहे. सोळाव्या शतकातील

रुढी, प्रथा, परंपरा, तत्कालीन राजकारण स्वराज्याची ओढ कर्तव्यतत्परता या सर्वांनी समृद्ध असलेले समाजजीवन कादंबरीतून चित्रित झाले आहे.

७.विश्वास पाटील यांनी ग्रामीण समाजजीवन बारकाव्यानिशी चित्रित केले आहे.

८.विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या वास्तवदर्शी आहेत.

अशा प्रकारे विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यामध्ये सामाजिक जीवनचित्रण सत्यदर्शी असल्यामुळे वाचक कादंबऱ्यांशी एकरुप होतो. वास्तवाची कास धरणाऱ्या कादंबऱ्या असल्यामुळे त्या विश्वासाहार्य वाटतात.

## संदर्भ

१.डॉ. नागनाथ कोत्तापल्ले :'ग्रामीण साहित्य स्वरुप आणि शोध',स्वरुप प्रकाशन औंर, आ, तृ. १००५पृ. क्र. १३.

२. डॉ. सदा कऱ्हाडे :'मानाचे पानः झाडाझडती' ललित मार्च १९९३ पृ.क्र. २१.

३. तत्रैव पृ.क्र.१४.

४. शंकर सारडा :'ग्रंथविशेष' मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, जाने १९९१ पृ. क्र.ॉ५.

५. शंकर सारडा :'विश्वास पाटील यांची महाकादंबरी संभाजी' मेहता मराठी ग्रंथजगत, जाने १९९५ पृ क्र.२४.



रामलीला सुदामराव पवार
मराठी विभाग प्रमुख कला महाविद्यालय, तीर्थपुरी.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.in